**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**विद्युत विभाग**

**विषय:- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर योजने अतंर्गत सन 2023-24 चा निधी खर्च झाल्याने निधी उपलब्धतेकामी लेखाशिर्ष तरतुदी मध्ये खर्चाचे पुर्नविनियोजन करणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्तावना**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्रमांक 22, वॉर्ड क्रमांक 13 मध्ये विविध ठिकाणी लाईट व्यवस्था करणे व वॉर्ड क्रमांक 15 मध्ये गौतम कंपाऊंड व वॉर्ड क्रमांक 16 मध्ये आसबिबी परिसरामध्ये लाईट व्यवस्था करणेकामी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर योजनेअतंर्गत सन 2023-24 करीता प्रस्ताव मंजुर करण्यात आले होते. त्याअनुषंगाने सदर कामांना शासन हिस्सा 70%(27.98 लाख) व मनपा हिस्सा 30%(11.96लाख) यानुसार मंजुरी प्राप्त् झालेली आहे.

सदरची कामे करणेकरीता सन 2024-25 मधील मनपा हिस्सा 30% प्रमाणे 11.96 लाख एवढा निधी "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान मनपा हिस्सा" लेखाशिर्षात उपलब्ध् नसल्याने सदर कामांच्या निविदा मंजुरी करिता अडथळा निर्माण झालेला आहे. सदरची कामे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | शासन हिस्सा (70%) | मनपा हिस्सा (30%) |
|---|---|---|---|---|
| 1. | भिवंडी शहरातील वॉर्ड क्रमांक 22 मध्ये विविध ठिकाणी स्ट्रिट लाईट बसविणे. | 995494.00 | 696846.00 | 298648.00 |
| 2. | भिवंडी शहरातील वॉर्ड क्रमांक 13 मध्ये विविध ठिकाणी स्ट्रिट लाईट बसविणे. | 999654.00 | 699758.00 | 299896.00 |
| 3. | भिवंडी शहरातील वॉर्ड क्रमांक 15 मध्ये गौतम कंपाऊंड येथे स्ट्रिट लाईट बसविणे. | 999979.00 | 699985.00 | 299994.00 |
| 4. | भिवंडी शहरातील वॉर्ड क्रमांक 16 मध्ये आसबिबी परिसरामध्ये स्ट्रिट लाईट बसविणे. | 998113.00 | 698679.00 | 299434.00 |

त्याअनुषंगाने वरिल प्रमाणे 30% हिस्सा (11.96 लाख) तरतुदीचे पुर्नविनियोजन करणे कामी प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

वरील प्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर योजने अंतर्गत सन 2023-24 मध्ये चार कामांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जिनिस/जिवायो/नगरोत्थान/का-4/2023-24/978 दिनांक 06/03/2024 च्या पत्रानुसार निधी मंजूर करण्यात आलेला असून वरिल चार कामांसाठी ई निविदा मागविण्यात आल्या असता ई निविदा प्राप्त झालेल्या असून मनपा हिस्सा (30%) निधी "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान मनपा हिस्सा" या लेखाशिर्षात शिल्लक नसल्याने निविदा मंजूरीसाठी प्रलंबित आहे. तरी सदरची निविदा मंजूरीकामी 30% मनपा हिस्सा अंदाजे एकूण 12 लाखांचा खर्च होणार आहे. महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडिल सन 2024-25 च्या अर्थसंकल्पीय तरतूद लेखाशिर्ष् "रस्त्यावरील दिव्यांसाठी खांब लावणे" या "भांडवली खर्चात" रुपये 230 लाख निधी मंजुर करण्यात आलेला होता. या लेखाशिर्षात आतापर्यंत 138.56 लाख निधि खर्च झालेला असून रूपये 91.43 लाख निधी शिल्ल्क आहे.

शिल्लक निधी 91.43 लाख रक्कमेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 101 (1) नुसार खालीलप्रमाणे पुर्नविनियोजन करणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त यांच्या कडे प्रस्ताव सादर केला होता. त्यास मा.

प्रशासक तथा आयुक्त् यांनी दिनांक 23/01/2025 रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नुसार नमुना नं. 10 (Form No. 10) नियिक 30(3) तरतुदीच्या अधिन राहुन पुर्नविनियोजन करिता प्रस्तावना सादर करण्यात येत आहे.

**या शिर्षातून**

| अनुक्रमांक | प्रधान,गौण् व तपशीलवार शीर्ष् | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | रस्त्यांवरील दिव्यांसाठी खांब लावणे | - | 230 लाख | 138.56 लाख | 91.43 लाख | उपलब्ध शिल्क निधी 91.43 लाख मधुन लेखा विभागातील लेखाशिर्ष **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान मनपा हिस्सा** मध्ये 12 लाख तरतुदीचे पुर्नविनियोजन केल्यानंतर **रस्त्यांवरील दिव्यांसाठी खांब लावणे** या लेखाशिर्षात 79.43 लाख शिल्लक |

**हया शिर्षात**

| प्रधान,गौण् व तपशीलवार शीर्ष् | लेखाविभाग विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान मनपा हिस्सा | - | 1596 लाख | 159439699.00 | 12 लाख | 12 लाख पुर्नविनियोजन केल्यानंतर एकुण शिल्लक तरतुद 13.60 लाख |

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 (अ) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त् सो. यांचे असल्याने सदर कामा करिता मनपा हिस्सा 30% निधी उपलब्ध होणे करिता विद्युत विभागाकडिल "रस्त्यावरिल दिव्यांसाठी खांब लावणे " या लेखाशिर्षातून लेखा विभागाकडिल "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान मनपा हिस्सा" या लेखाशिर्षात रक्कम रुपये 12 लाख तरतुदींचे पुर्नविनियोजन करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

ठराव 638                                                    दिनांक 01/02/2024

**विषय:- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर योजने अतंर्गत सन 2023-24 चा निधी खर्च झाल्याने निधी उपलब्धतेकामी लेखाशिर्ष तरतुदी मध्ये खर्चाचे पुर्नविनियोजन करणेबाबतचा प्रस्ताव.**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर योजने सन 2023-24 अतंर्गत चार कामांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जिनिस/जिवायो नुसार निधी मंजूर करण्यात आलेला असून वरिल चार कामांसाठी ई निविदा प्राप्त झालेली असून मनपा हिस्सा (30%) निधी शिल्लक नसल्याने निविदा मंजूरीसाठी प्रलंबित आहे. तरी सदरची निविदा मंजूरीकामी अंदाजे एकूण 12 लाखांचा खर्च होणार असल्याने सदर कामां करिता निधी उपलब्धतेकामी तरतुदींचे पुर्नविनियोजन करणेकामी प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव प्र.कार्यकारी अभियंता (विद्युत), शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, अतिरीक्त् आयुक्त् यांनी केलेल्या शिफारशी नुसार नगरविकास विभागाकडिल शासन निर्णय क्रमांक एम.सी.ओ. -2020/प्र.क्र.71(भाग-2)नवी 14 दिनांक 6 जून 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विषेशत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार श्री.अजय वैद्य प्रशासक विद्युत विभागाकडिल "रस्त्यावरील दिव्यांसाठी खांब लावणे" या लेखाशिर्षातून लेखा विभागाकडिल "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान मनपा हिस्सा" लेखाशिर्षात रुपये 12 लाख तरतुदींचे पुर्नविनियोजन करण्यास मान्य्ता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त्**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**

नमुना क्रमांक १०
(FORM 10)
नियम ३०(३) पहा
(see Rule 30(3))

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
(Bhiwandi Nizampur City Municipal Corporation)

महानगरपालिकेला दिनांक ---------२०    च्या सभेत सादर केलेले पुर्नविनियोजनाचे विवरणपत्र
(Statement of Reappropriation submitted to the Council of the meeting held ------ 20 )

| अनुक्रमांक (serial No) | या शीर्षातुन (Form) | | | | | ह्या शीर्षात (To) | | | | | अभिप्राय (Remarks) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रधान,गौण व तपशीलवार शीर्ष (Majar,Minor and detailed Head) | बांधकाम विषयक सेवा वगैरे (works, services etc.) | मुळ अनुदान (Original Grant) | आज तारखे पर्यंत खर्च (Expenditure to date) | उपलब्ध शिल्लक (Balance available) | प्रधान,गौण व तपशीलवार शीर्ष (Majar,Minor and detailed Head) | लेखाविभाग विषयक सेवा वगैरे (works, services etc.) | मुळ अनुदान (Original Grant) | आज तारखे पर्यंत खर्च (Expenditure to date) | प्रस्तावित वाढीची रक्कम (Amount proposed to be incrcased) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | रस्त्यावराल दिव्यांसाठी खांब लावणे | - | २३० लाख | १३८.५६ लाख | ९१.४३लाख | महाराष्ट्र सुवण जयंती नगरोत्थान मनपा हिस्सा | - | १५९६ लाख | १५९४३९६९९.०० | १२ लाख | **महाराष्ट्र सुवण जयती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजना सन २३-२४ अतंर्गत चार कामांसाठी मनपा हिस्सा शिल्लक नसल्याने** रस्त्यांवरील दिव्यांसाठी खांब या लेखाशिर्पातुन १२ लाख पुर्नविनियोजन केल्यानंतर एकूण शिल्लक तरतुद ७९.४३ लाख |

प्र.कार्य.अभियंता
भिवंडी नि. श. महानगरपालिका

शहर अभियंता
भिवंडी नि. श. महानगरपालिका

मुख्य लेखा परिक्षक
भिवंडी नि. श. महानगरपालिका

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
भिवंडी नि. श. महानगरपालिका

उप आयुक्त (मुख्या.)
भिवंडी नि. श. महानगरपालिका

अतिरिक्त आयुक्त
भिवंडी नि. श. महानगरपालिका

आयुक्त
भिवंडी नि. श. महानगरपालिका